**-: प्रेसनोट दिनांक- ५/०२/२०२१ :-**

**०००० यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार हे सुतगिरणीचे चेअरमन आहेत. सदर संस्था ही शासनाने अवसायनात काढलेने अवसायक यांनी सुतगिरणीची नोंदणी रदद करणेची असलेने त्या करीता संस्थेच्या जमीनीची शासकिय मुल्यांकन करुन दाखला देणेसाठी मुद्रांक जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना पत्र दिले होते तसेच तक्रारदार संस्थेचे चेअरमन असुन वरील जमीनीचे ७/१२ उता-यावर त्यांचे नावे आहे. त्यामुळे मालमत्तेचे मुल्यांकन लवकर करुन दाखला लवकरात लवकर मिळावा म्हणुन ते वैयक्तीकरित्या मध्यवर्ती प्रशासकिय इमारत कसबा बावडा कोल्हापूर येथील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात जावुन तेथील गणेश माने सहायक नगर रचनाकार सह जिल्हा निबंधक कोल्हापूर यांना वेळोवेळी भेटले होते. दिनांक २१.१.२०२१ रोजी तक्रारदार मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात जावुन गणेश माने सहायक नगर रचनाकार यांना भेटुन त्यांनी मिलच्या मालमत्तेचे मुल्यांकन करुन लवकरात लवकर दाखला देणेची विनंती केली असता गणेश माने सहायक नगर रचनाकार यांनी मुल्यांकन करुन दाखला द्यायचा असेल तर ४५ लाख रुपये द्यावे लागतील असे सांगीतले. तक्रारदार यांना गणेश माने सहायक नगर रचनाकार यांना ४५,००,००० लाख लाच रक्कम दयायची इच्छा नसलेने त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे गणेश माने सहायक नगर रचनाकार यांचे विरुध्द तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक २१/०१/२०२१ व दिनांक १.२.२०२१ रोजी मध्यवर्ती प्रशासकिय इमारत कसबा बावडा कोल्हापूर येथील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष गणेश माने सहायक नगर रचनाकार यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये गणेश माने सहायक नगर रचनाकार यांनी तक्रारदार यांचेकडे मिलचे मालमत्तेचे शासकिय मुल्यांकन करुन दाखला देणेसाठी ४५ लाख रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता २० लाख रुपये तक्रारदार यांना घेवुन येणेस सांगुन राहिलेले २५ लाख रुपये दाखला देताना नंतर घेवुन येणेस सांगीतलेचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ५.२.२०२१ रोजी गणेश माने सहायक नगर रचनाकार यांचे विरुध्द मध्यवर्ती प्रशासकिय इमारती मधील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात सापळा कारवाई आयोजित केली असता तक्रारदार व गणेश माने सहायक नगर रचनाकार हे दोघेजन कार्यालयातुन बाहेर पडुन कार्यालयाचे आवारातील चहाचे टपरीवर गेले व त्या ठिकाणी गणेश माने सहायक नगर रचनाकार यांनी तक्रारदार यांचेकडुन २० लाख रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक गणेश माने सहायक नगर रचनाकार वर्ग २ सह जिल्हा निबंधक कार्यालय मध्यवर्ती प्रशासकिय इमारत कसबा बावडा कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौडा अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार संजीव बंबर्गेकर,पोहेकॉ शरद पोरे, पोना नवनाथ कदम,सुनिल घोसाळकर व पोकॉ मयुर देसाई व चालक पोहेकॉ सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.